ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# ग्रामस्वच्छता आणि महात्मा गांधी

*प्रा. डी.एन. रिठे*
*इतिहास विभाग*
*र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई जी. बीड*

**प्रस्तावना**

सध्या देशात असलेल्या अनेक समस्यांपैकी स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन या समस्याही महत्वाच्या बनलेल्या आहेत. गांधीजींनी आपल्या आचार-विचार आणि कृतींमधून अनेकदा स्वच्छतेला जीवनात प्राधान्य असले पाहिजे हे दाखवून दिलेले आहे. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे स्वच्छता, साफसफाई, प्रदूषण निर्मूलन, आरोग्य, पर्यावरण संवर्धनासाठी विकेंद्रित रचना आवश्यक आहे. त्यामध्ये लोकसहभागाची आवश्यकता असते. त्याशिवाय स्वच्छतेची परिपूर्ण उपाययोजना करता येणार नाही.आणि त्याशिवाय ग्राम विकासही साधता येणार नाही

**उद्दिष्ट्ये :**

1. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वच्छतेच्या कार्याचा व विचारांचा अभ्यास करणे
2. ग्राम विकासाच्या प्रक्रियेत ग्रामस्वच्छतेचे महत्व याचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती :**

सदरील संशोधन पेपरसाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला आहे.

गांधीजी नेहमी म्हणायचे की स्वातंत्र्यापेक्षा स्वच्छता महत्त्वाची आहे. त्यांच्या या विचारावरून आपण समजू शकतो की त्यांच्यासाठी स्वच्छता किती महत्त्वाची होती. त्यांनी स्वच्छ आणि निरोगी भारताची कल्पना केली. आरोग्य, पाणी हे स्वच्छतेशी निगडित असणारे विषय आता प्रदूषणाच्या समस्या बनलेल्या आहेत. प्रदूषणाचे प्रश्न जागतिक समस्यांचाही भाग असतात, जसे हवामानबदल त्याचा सामना प्रत्येकास करावा लागत आहे. म्हणून गांधीजींचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. गांधीजीनी म्हटले होते स्वच्छता ही बाहेरून कोणीतरी लादून येत नसते तर ती स्वतः अंगीकारावी लागते त्यामध्ये कृती असते. स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घ्यावा लागतो, मनोबल वाढवावे लागते. ही कुणा दुसऱ्यावर सोपवण्याची गोष्ट नाही. म्हणून प्रत्येकाने स्वच्छतेमध्ये सहभाग घेतला पाहिजे. गांधीजींच्या काळी पाणी-पर्यावरण संसाधनांचे प्रश्न तितकेसे गंभीर नव्हते, तरीसुद्धा स्वच्छता आणि नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवण्याच्या अनुषंगाने त्यांनी स्वतः प्रयोग करून त्यास चालना दिली आणि समाजघटकांना अंगीकारण्यास प्रवृत्त केले. 'महात्मा गांधी यांनी देशाला व जगाला शेकडो संकल्पना दिल्या. त्यात ग्रामस्वराज्य व स्वच्छता हि संकल्पना महत्वाची आहे. देशातील सात लाख खेडी स्वयंपूर्ण झाली तरच देशाची प्रगती होईल, अशी महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना होती. गावांना विकसित करण्याचे सामर्थ्य गांधी विचारात आहे. आणि ती आता आपल्याला पूर्ण होताना दिसत आहे. ‘स्वच्छ भारत अभियान’ ही भारत सरकारने स्थापन केलेली मोहीम आहे. या स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे ठिकठिकाणी शिबिरे आयोजित करणे कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांना तपासून होणाऱ्या फायद्याविषयी जागृत करणे ग्रामपंचायतीच्या मदतीने सर्व घरामध्ये असलेल्या कचऱ्याचे आणि सांडपाण्याची व्यवस्थापन वैज्ञानिक पद्धतीने करणे शिकविले जात आहे. स्वच्छ भारत अभियान भारत सरकारचा एक कौतुकास्पद प्रयत्न आहे. जर पाहिले तर आपल्या सभोवताली स्वच्छता राखणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे प्रत्येक जण आपले घर आणि घराच्या अंगण स्वच्छ करतील परंतु काहीजण असतात जे आपल्या घरामध्ये असलेली घाण आणि कचरा रस्त्यावर चौकावर फेकून देतात विचार करा आपल्यासाठी हे किती लज्जास्पद आहे त्यांना वाटत नाही की संपूर्ण देश आपले घर आहे ती ही स्वच्छ ठेवणे आपली काम आहे.

**ग्राम स्वच्छतेचे महत्त्व**

आज काल आपण आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी इतरांकडून अपेक्षा ठेवतो आपली ही सवय बदलली पाहिजे गांधीजी नेहमी म्हणायचे की जर आपल्याला समाजात बदल पहायचा असेल तर प्रथम आपण स्वतःला बदलले पाहिजे कोणताही शेजारी किंवा बाहेरचा माणूस स्वच्छ करण्यासाठी येणार नाही आपल्याला स्वतःच ती स्वच्छ करावी लागेल हे केवळ आपल्यासाठीच नव्हे तर संपूर्ण

देशासाठी देखील आवश्यक आहे. ग्रामीण भाग स्वच्छ करण्यासाठी आणि लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी यापूर्वी भारत सरकारने निर्मल भारत अभियानाची स्थापना केली होती पण आता याची स्वच्छ भारत अभियान म्हणून पुनर्रचना करण्यात आली आहे ग्रामीण भागातील स्वच्छ भारत अभियानाची उद्दिष्ट म्हणजे ग्रामस्थांनी शौचालयाचा वापर करावा आणि उघड्यावर सोचात जाऊ नये. उद्दिष्ट साकारण्यासाठी सरकारने 11 लाख शौचालयाच्या बांधकामासाठी एक लाख कोटी रुपये खर्च करण्याची योजना आखल्या जाऊन ग्रामीण भागातील प्रत्येक घरात शौचालय बांधण्यासाठी प्रत्येक घराला 12 हजार रुपये अनुदान देण्याचे सरकारने निच्छित जेणेकरून तेथील लोकांना शौचालय बांधता येतील आणि भारत स्वच्छ करण्यात त्यांची मदत होईल. स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, योग्य स्वच्छता वापरून लोकांची मानसिकता बदलणे, शौचालयाच्या वापरास प्रोत्साहन देणे आणि जनजागृती करणे.इत्यादी कार्य हाती घेण्यात आले आहे. आपल्या जीवनात स्वच्छतेचे महत्व कोणीही नाकारू शकत नाही. स्वच्छ परिसर, हवा, पाणी, वातावरण कोणाला नकोसे असते. स्वच्छतेने रोगराई नाहीशी होते, आजार पसरत नाहीत, आणि आपली जीवन शैलीही बदलून जाते.

**निष्कर्ष :**

सार्वजनिक स्वच्छता यावर महात्मा गांधीजींची आयुष्यभर आस्था होती. गांधीजींनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ भारतीयांना स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल प्रेरित करण्यासाठी समर्पित केला. स्वच्छता आणि नैसर्गिक साधनसंपत्ती जतन करण्याचा संदेश व गावांचे स्वराज्य या मुद्यावर गांधींचे विचार आज प्रत्यक्षात येणे शक्य गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**

1. नलिनी पंडित, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई २००६
2. नारायणभाई देसाई, रचनात्मक कार्यक्रम, (मराठी अनुवाद), महात्मा गांधी तत्वज्ञान मंदिर, धुळे, २००६
3. रंगराव दिवाकर, गांधीजींचा त्रिविध संदेश, गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे १९९४
4. इंटरनेट